मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०५ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • मे-२०२३



## राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन

# हसती दुनिया

अंक ०५ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • मे-२०२३

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
संजय तु. जालगांवकर • राजनंदन कृ. पिंपळकर
श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : hduniya.marathi@nirankari.org
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org



लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


सदस्यता शुल्क

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९


०५


०९

## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- कुतुहल १५
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- आरोग्याचा मंत्र ३५
- सामान्य ज्ञान ४७
- रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- विशेष - पुरस्कार २३
- भ्रमंती २८
- स्वामी विवेकानंद : प्रेरक प्रसंग ३३
- संतकथा ३७
- ज्ञानासंगे मनोरंजनाची सफर ४२
- विलक्षण ४४-४५
- १०वी नंतरच्या करिअरच्या वाटा ४८








## कथा


- द्वारका नगरीचा अस्त ०५
- धर्माचं कार्य ०९
- दैव देते आणि कर्म नेते २०
- खरे सोबती २१
- देव कुठे आहे २४
- संतांची समदृष्टी ३२








## कविता


- सारं काही स्वतःसाठी १२
- मी एक कामगार ३६
- शीश गुरुचरणी वाहिले ४६

# स्वच्छ मनाचं प्रतिबिंब

आपल्याकडे एक म्हण आहे– 'आडात असेल तेच पोहऱ्यात येणार' किंवा 'पोटात असेल तेच ओठात येणार.' याच आशयाचं इतिहासात आढळणारं एक सुंदर उदाहरण माता सविंदरजींनी आपल्या प्रवचनात दिलं होतं.

एके काळी जर्मनी या देशाचं विभाजन करण्यात आलं होतं. त्यासाठी पूर्व आणि पश्चिम अशी विभागणी करणारी भिंत बर्लीन या शहरात उभारली गेली. त्यामुळे पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी असे दोन भाग पडले. एकदा पूर्व जर्मनीच्या लोकांनी एका ट्रकमध्ये खूप सारा कचरा भरला आणि तो पश्चिम जर्मनीच्या भिंतीकडे फेकला. आता पश्चिम जर्मनीच्या लोकांनाही जशास तसं उत्तर देता आलं असतं; परंतु त्यांनी काय केलं, एका ट्रकमध्ये खूप सारे खाद्यपदार्थाचे पॅकेट्स आणि पाण्याच्या बाटल्या भरल्या. त्या पूर्व जर्मनीच्या भिंतीलगत व्यवस्थित रचून ठेवल्या आणि तिथे एक बोर्ड लिहिला– 'ज्याच्याकडे जे असतं तेच तो दुसऱ्याला देत असतो.'

मित्रांनो, ज्यांच्या हृदयामध्ये प्रेम, नम्रता, दया, करुणा इत्यादी दैवी गुण असतात ते कधीही कोणाशी वाईट वागत नाहीत. त्यांच्याशी कुणी वाईट वागलं तरी ते चांगुलपणानेच वागतात. कारण सद्‌गुण त्यांच्यात ठासून भरलेले असतात.

अलीकडेच 'स्वच्छ जल–स्वच्छ मन' हा प्रकल्प मिशनतर्फे सर्वत्र राबवण्यात आला. त्यानुसार देशभरातील पाणवठे स्वच्छ केले गेले. शुद्ध पाण्याचं महत्व सर्वांच्या लक्षातही आलं. अर्थात हे काही नवीन आहे अशातला भाग नाही. अनेक संस्था किंवा सरकारकडून अशी स्वच्छता केली जाते; परंतु 'स्वच्छ मन' हे अभियान मात्र कुठल्याही सरकारकडून किंवा सामाजिक संस्था अथवा न्यायव्यवस्थेकडून होत नसतं. स्वच्छ मनाची घडण ही सत्संगातच होत असते. स्वच्छ मनातच दैवी गुणांची निर्मिती होत असते. त्यामुळे निरोगी आणि शांतताप्रिय समाज घडवण्यात फार मोठा हातभार लागतो. पश्चिम जर्मनीच्या लोकांनी स्वच्छ मनाचं उत्तम उदाहरण आपल्या कृतीने जगापुढे ठेवलं.

आज मिशनमध्ये आपल्याला अशाच दैवी गुणांची शिकवण सद्‌गुरुकडून प्राप्त होत असल्यामुळे आपल्या स्वच्छ मनाचं प्रतिबिंब परोपकाराच्या अनेक कार्याच्या रुपाने समाजापुढे येत आहे. ही शिकवण आपण इतरांनाही दिली पाहिजे, नाही का ?

– राजेंद्र थोरात



पौराणिक कथासार

# द्वारका नगरीचा अस्त

भगवान श्रीकृष्णाने मथुरा सोडून द्वारका नगरी बसवली. जेणेकरून सर्व यदुवंशियांना आनंदाने जीवन जगता यावं. द्वारकानगरी सर्व सुखसोयींनी आणि धनधान्याने समृद्ध होती. नगरीत कोणीही दुःखी नव्हतं; परंतु तरीही महाभारत युद्ध संपल्यानंतर छत्तीस वर्षानंतर श्रीकृष्णाची द्वारका नगरी समुद्रात बुडाली.

या पाठीमागे दोन कारणं आहेत. एक म्हणजे कौरवांची माता गांधारी हिने दिलेला शाप. आणि दुसरं कारण म्हणजे ऋषींनी श्रीकृष्णपुत्र सांब याला दिलेला शाप.

महाभारताचे महायुद्ध संपल्यानंतर ज्येष्ठ पांडूपुत्र युधिष्ठिर याला राज्याभिषेक करण्यात आला. तेव्हा कौरवांची माता गांधारी हिने महाभारताच्या युद्धासाठी श्रीकृष्णाला दोषी ठरवले आणि त्याला शाप दिला, की जसा, कौरवांच्या वंशाचा नाश झाला, तसा तुझ्या यदुवंशाचा देखील नाश होईल.

महाभारताचं युद्ध संपून जवळपास छत्तीस वर्षे होत आली.त्यावेळी निरनिराळे अपशकुन होऊ लागले. एके दिवशी महर्षी

विश्वामित्र, ऋषी कण्व व देवर्षी नारद हे द्वारकेला गेले. तेव्हा तिथे यादवांचे काही तरुण त्या ऋषींची चेष्टा करू लागले. त्यांनी श्रीकृष्णाचा पुत्र सांब याला स्त्री वेषात ऋषींकडे नेले आणि सांगितले, की ही स्त्री गर्भवती आहे. तिला काय होईल ते कृपया सांगावे? ऋषींनी पाहिलं, की हे तरुण आपला अपमान करत आहेत. तेव्हा क्रोधीत होत त्यांनी शाप दिला, की यदु आणि अंधारवंशीय पुरुषांचा नाश करण्यासाठी एक लोखंडाचा मुसळ उत्पन्न होईल आणि तो तुम्हा सर्वांच्या नाशाचे कारण ठरेल. तुमच्यासारख्या मदांध आणि उन्मत्त लोकांच्या कुळाचा संहार होईल. या मुसळापासून केवळ श्रीकृष्ण आणि बलराम हेच वाचू शकतील. जेव्हा ही गोष्ट श्रीकृष्णांना कळली तेव्हा त्यांनी म्हटले, की ही गोष्ट सत्य होईल. राजा उग्रसेन यांना ही बातमी कळताच त्यांनी त्या मुसळाचा बारीक चुरा करुन समुद्रात फेकून दिला. त्यानंतर त्यांनी घोषणा केली, की कोणीही घरामध्ये मदिरा तयार करू नये आणि प्राशनही करु नये. अनेक अपशकून तर घडतच होते. नगरीत अचानक उंदरांची संख्या वाढू लागली. ते माणसांचे केस, नखं कुरतडून खाऊन जात. घुबडं, गिधाडं चित्रविचित्र आवाज करु लागले. कुत्री भेसूर आवाजात रडू लागली. श्रीकृष्ण म्हणाले, आता गांधारीचा शाप खरा ठरण्याची वेळ आलेली आहे. श्रीकृष्णाने यदुवंशियांना तीर्थयात्रा करण्याची आज्ञा केली. त्यांच्या आज्ञेनुसार सारे यदुवंशी समुद्रकिनारी प्रभासतीर्थी येऊन राहू लागले. समुद्रकिनारी राहात असताना यदु आणि अंधारवंशीय आपसामध्ये बोलत असताना त्यांनी एकमेकांचा अनादर केला. कृतवर्माने पण सात्यकीचा अपमान केला. सात्यकीने रागाने कृतवर्माचा वध केला. सारे अंधारवंशीय सात्यकीला मारायला धावले. सात्यकीला एकटं पाहून प्रद्युम्न त्याला वाचवायला गेला; परंतु अंधारवंशीयांची संख्या जास्त असल्यामुळे सात्यकी आणि प्रद्युम्न मारले गेले. ते पाहून श्रीकृष्णाने क्रोधित होत एक गवताची काडी उपटली. त्याबरोबर तिचं मुसळात रुपांतर झालं. त्याच्याने श्रीकृष्णांनी अंधारवंशियांचा नाश सुरु केला. प्रत्येक वीर त्या गवताच्या काड्या उपटून एकमेकांवर प्रहार करु लागले. पाहता पाहता अनेक वीर ठार झाले. केवळ श्रीकृष्णांचा सारथी दारुक वाचला. श्रीकृष्णांनी त्याला ताबडतोब हस्तीनापुरी पाठवून अर्जुनाला बोलावून घेतले. श्रीकृष्णाने ही घटना आपले पिता वसुदेव यांना सांगितली. त्यांना खूप दुःख झाले. बलरामजी ध्यानात मग्न होते. त्यांच्या तोंडातून शेषनाग प्रगट होऊन तो समुद्राकडे निघून गेला. अशा प्रकारे बलरामजींचा अवतार संपला. आता आपलंही कार्य संपलं म्हणून श्रीकृष्णांनी धरतीवरती अंग टाकले आणि ते समाधीत लीन झाले. त्याच वेळी हरणाची शिकार करायला आलेल्या शिकाऱ्याने त्यांच्या पायाला हरीण समजून बाण सोडला; श्रीकृष्णांनी बाण लागल्याचे निमित्त करुन देह सोडला. त्यानंतर वसुदेवांनी देखील आपला देह सोडला. त्यांच्याबरोबर त्यांच्या तिन्ही राण्या सती गेल्या. अर्जुनाने मरण पावलेल्या सर्व यदुवंशीयांचा अंतिम संस्कार केला आणि सातव्या दिवशी नगरवासीयांना घेऊन तो इंद्रप्रस्थला निघून गेला. तो जाताच द्वारकानगरी समुद्रामध्ये बुडून गेली. अशाप्रकारे द्वारका नगरीचा अस्त झाला. ◆

# दर्पणकार, बालबृहस्पती
# आचार्य बाळशास्त्री जांभेकर



६ जानेवारी १८१२ साली आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म झाला.कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील 'पोंभुर्ले' हे त्यांचे गाव. या गावात अतिशय गरीब कुटुंबात त्यांचे बालपण गेले. हालाकीची परिस्थिती असतानाही आई सगुणाबाई आणि वडील गंगाधरशास्त्री यांनी त्यांना शाळेत घातले. जन्मजात अफाट बुद्धिमत्ता लाभलेले बाळशास्त्री शालेय जीवनात प्रचंड वेगाने विद्याभ्यास करु लागले. पाठांतर दांडगे असल्यामुळे स्वतःच्या इयत्तेतील पुस्तके समजून घेतल्यानंतर पुढच्या दोन दोन इयत्तामधील अभ्यास ते एकत्रितरित्या करु लागले. त्यांची तल्लख बुद्धिमत्ता पाहून सर्वजण त्यांना 'बालबृहस्पती' म्हणू लागले. १८२६ साली त्यांनी मुंबई एजुकेशन सोसायटी या इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला. त्यांच्या सखोल अभ्यासामुळे वयाच्या १४व्या वर्षी त्याच शाळेत गणिताचे शिक्षक म्हणून त्यांना नोकरी मिळाली .पुढे विविध भाषा शिकण्याचा सपाटा सुरु केला. अल्पावधीतच मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराथी, कानडी, तेलुगू, इंग्रजी, फारसी, फ्रेंच, लॅटिन, ग्रीक, उर्दू या सर्व भारतीय आणि परदेशी भाषांवर त्यांनी प्रभुत्व मिळवले. त्यांनी खगोलशास्त्राचाही अभ्यास सुरु केला आणि त्यातही पारंगत झाले.

१८३४ साली एल्फिन्स्टन महाविद्यालयाची स्थापना झाली.त्या महाविद्यालयात वयाच्या २२व्या वर्षी रुजू होणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे पहिले मराठीचे प्राध्यापक होते. गणित, भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र हे अवघड विषय ते शिकवायचे. दादाभाई नवरोजी, भाऊ दाजी लाड हे त्यांच्या हाताखाली शिकून गेलेले काही महान विद्यार्थी. आपल्या जन्मदिनी म्हणजे ६ जानेवारी १८३२ साली त्यांनी 'दर्पण' हे द्विभाषिक वर्तमानपत्र मुंबईत काढले. महाराष्ट्रातील हे पहिले मराठी वर्तमानपत्र! त्यांचा जन्मदिवस 'पत्रकार दिन' (दिवस) म्हणून साजरा केला जातो.

बाळशास्त्रींनी पुस्तके लिहिण्याचाही उपक्रम हाती घेतला. शालेय पाठयपुस्तके निर्मिती करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. इतिहास, भूगोल, गणित, छंदशास्त्र, नीतिशास्त्र या विषयांवर त्यांनी पुस्तके लिहिली. बालव्याकरण सारखी मराठी पाठयपुस्तके सर्वप्रथम त्यांनी बनवली. उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही त्यांनी

पुस्तके लिहिली. इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना अवघड वाटणाऱ्या विषयावर आधारित 'शून्यलब्धी' हे पुस्तक लिहिले. आध्यात्मिक क्षेत्रात पाऊल टाकत त्यांनी १८४५ साली ज्ञानेश्वरीचे पाठभेदांसहित संपादन करुन ज्ञानेश्वरीची पहिली छापील प्रत जगाला उपलब्ध करुन दिली.

कोकणात गावागावात जाऊन विविध भाषांमधील उपलब्ध ताम्रपटाचे वाचन करून इतिहास लेखन करण्याचे महत्वपूर्ण काम त्यांनी केले. या त्यांच्या कार्यामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे आद्य इतिहासकार' असेही म्हटले जाते. विधवा विवाहाचे ते समर्थक होते आणि त्यामुळेच राजा राममोहन रॉय यांचे ते चाहते होते. रॉय यांचे बंगाली भाषेतील लिखाण वाचता यावे फक्त यासाठी ते बंगाली भाषा शिकले.

बाळशास्त्री तत्वाचे पक्के होते. मुंबई विभागाचे शाळा इन्स्पेक्टर म्हणून नियुक्ती झाली असताना एकदा पगारात १ रुपया जास्त दिला गेला. ही बाब त्यांनी संबंधित ब्रिटिश खात्याकडे कळवली व पुढील महिन्यात तो एक रुपया कमी देण्याची विनंती केली.

बाळशास्त्रींनी अनेक पदे भूषवली. कुलाबा वेधशाळेचे संचालक, जस्टीस ऑफ पीस, विद्यामुकुटमणी, आद्यकृषी अशा विविध पदव्या लोकांनी त्यांना दिल्या. बाळशास्त्रींनी विविध विषयांवर अनेक पुस्तके लिहिली. दुर्दैवाने ते अल्पायुषी ठरले. १८ मे १८४६ रोजी वयाच्या अवघ्या ३३व्या वर्षी कोकणातील वनवेश्वर येथे इतिहास लेखन करत असताना ताप येऊन त्यांचा मृत्यू झाला. ◆

# तुम्हाला माहीत आहे का?

- जगातील सर्वांत पहिल्या मुद्रित पुस्तकाचे नाव ''हीरक सूत्र'' आहे.
- जगात सर्वांत पहिले पेट्रोल पंप १९०७ मध्ये कॅलिफोर्निया (अमेरिका) मधील रिएटल शहरात स्थापन करण्यात आले.
- जगातील पहिले पोस्टकार्ड सन १८६९ मध्ये ऑस्ट्रेलियात वापरात आले.
- जगात सर्वांत पहिली ट्रेन २६ सप्टेंबर १८२५ ला ब्रिटनच्या स्टॉकटनपासून आणि डर्लिंगटन पर्यंत चालली.
- जगातला सर्वांत जुना खेळ पोलो आहे.
- जगातलं सर्वांत पहिले फिंगरप्रिंट ब्यूरो सन १९२७ ला कोलकाता येथे स्थापन झाले.
- जगातले सर्वांत लांबीचे (झुलणारे) पूल आकाशी काइमो नावाचे आहे. ते जपानमध्ये आहे त्याची लांबी ३९११ मीटर आहे.
- जगातील पहिला अंतराळ पर्यटक डेनिस टिटो (अमेरिका) हा आहे.
- जगातील पहिला SMS ३ डिसेंबर १९९२ रोजी "Merry Christmas" असा अभियंता नील पापवर्थ यांनी सहकारी रिचर्ड जार्विसला पाठवला.
- पृथ्वीच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणारा जगातील पहिला व्यक्ती रोआल्ड अमुंडसेन होता.

◆



# धर्माचं कार्य

सुमारे पाच–सहाशे वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. औरंगाबाद शहराजवळ निपट निरंजन नावाचे एक साधू होऊन गेले. त्या विभागात हिंदू–मुसलमान दोन्ही धर्मांचे लोक मोठ्या संख्येने राहत होते. हिंदू–मुसलमानांमध्ये ऐक्य निर्माण व्हावे म्हणून त्यांनी आपल्या परीने अनेक प्रयत्न केले.

त्यांचे हे प्रयत्न पाहून त्यांच्या एका शिष्याला वाटलं, की आपणही त्यांच्या कार्याला हातभार लावावा, हिंदू मुसलमानांना एकाच वास्तूमध्ये एकत्र आणावे म्हणून त्याने आपल्या जागेवर एक मंदिर बांधले. मंदिरामध्ये हिंदू लोक नित्यनेमाने येऊन पूजा–पाठ करु लागले; परंतु मुसलमान येत नसत.कालांतराने त्याने मंदिराच्या जवळ एक मशीद बांधली. आता मशीदीत मुसलमान येऊ लागले; परंतु तिथं हिंदू येईनात.

त्याने ही गोष्ट निपट निरंजन साधूंना सांगितली. त्यावर ते म्हणाले, "वत्सा! जोपर्यंत लोकांना ईश्वर, अल्ला एकच आहे, ही गोष्ट कळत नाही, आपला परमपिता एकच आहे ह्याची जाणीव होत नाही. तोपर्यंत हिंदू मुसलमान एक होणं शक्य नाही. प्रार्थना स्थळं बांधून ऐक्य निर्माण करणं किंवा त्याला धर्माचं कार्य म्हणनं चुकीचं आहे, त्यापेक्षा लोकोपयोगी वास्तू बांधून त्याचा उपयोग लोकांसाठी करणं हे खरे धर्माचं कार्य आहे." शिष्याने विचारले, "महाराज! अशी कोणती वास्तू बांधली तर तिथं दोन्ही धर्मांचे लोक एकत्र येतील, म्हणजे मला धार्मिक कार्य केल्याचाही आनंद होईल?"

साधू म्हणाले, "सध्या तरी असा कुठला मार्ग नाही; परंतु जर तुम्हाला दोन्ही धर्मासाठी एखादी वास्तू बांधायचीच असेल तर स्वच्छतागृह बांधा." त्यांच्या आदेशानुसार त्यांनी स्वच्छतागृह बांधलं. आता तर रोज सकाळी दोन्ही धर्मांचे लोक नियमित येऊ लागले. लोकांची रोजची अडचण दूर झाली. गावात स्वच्छता दिसू लागली. लोक शिष्याला धन्यवाद देऊ लागले.

लोक कल्याणाचं कार्य हेच खरं धर्माचं कार्य आहे. ◆

# श्रेष्ठत्व जोडून राहण्यात



जीवनात प्रत्येक जण स्वतःला जास्त महत्त्व देत असतो. आपल्यापेक्षा कोणी श्रेष्ठ नाही असं समजतो! जसं ते एक उदाहरणही दिलं जातं, की एक राजा होता. तो अतिशय विनम्र होता.जेव्हा वजीराच्या मनात ही गोष्ट आली, की आपला राजा कोणी गरीब असो किंवा श्रीमंत असो, कोणी कसाही असो प्रत्येकाशी प्रेमाने, मस्तक झुकवून, हसतमुखाने बोलतो. यामुळे आपलं स्वतःचं महत्व कमी करत आहे. वजीराने राजासमोर ही गोष्ट ठेवली, की आपण सगळ्यांच्या समोर विनम्रतेने मस्तक झुकवून बोलू नये. प्रजेवर याचा चांगला प्रभाव पडणार नाही. आपण तर महाराज आहेत. आपण मान वर करुनच सर्वांशी भेटायला हवं. त्यावर राजा वजीराला म्हणाला, की तुम्ही एक काम करा, आपल्या नगरीत जर कुणाचा मृत्यू झाला तर त्याचं शीर घेऊन बाजारात विकायला न्या आणि त्याची किती किंमत येते ते मला सांगा. राजाने सांगितल्याप्रमाणे वजीर मृत माणसाचं शीर घेऊन गेला; परंतु कोणीही ते विकत घेतलं नाही. ही गोष्ट जेव्हा वजीराने राजाला सांगतली, तेव्हा राजा म्हणाला, की जी ताठ मानेने चालण्याची गोष्ट तुम्ही सांगता त्याची किंमत तर शून्य आहे. तेव्हा हे शीर प्रत्येकापुढे आदर सत्काराने जर झुकवलं तरच त्याची खरी किंमत आहे. मनापासून विनम्र होऊन जर आपण कोणाशी बोललो, भेटलो तर त्यात आपल्याला कमीपणा येत नाही. या मस्तकाची किंमत आखडून चालण्यात नाही तर झुकण्यातच आहे. नेहमी हसतमुखाने, प्रसन्नतेने राहणे, अहंकाराचा त्याग करणे, हेच खऱ्या अर्थाने जीवन जगणे आहे. आपलं स्वतःचं अस्तित्व विसरुन अहंकाराचा त्याग करुन जेव्हा आपण जीवन जगू लागतो तेव्हा या परमात्म्याची ओळख हीच आपली ओळख होऊन जाते. ज्याप्रमाणे एक पाण्याचा थेंब भले तो गटारातून नदीमध्ये आलेला असेल तो वाहत वाहत जेव्हा सागरात येतो तेव्हा त्याला सागराचं अस्तित्व प्राप्त होतं. जर तो हट्टाने

गटाराचाच थेंब होऊन राहिला तर त्याला सागराची विशालता प्राप्त होणार नाही. यासाठी अहंकार सोडून विनम्रतापूर्वक जीवन जगलं पाहिजे. एखाद्यासमोर आपला प्रभाव पाडण्यासाठी आपण चांगला व्यवहार करु शकतो; परंतु कायमस्वरुपी ती अवस्था राहत नाही. त्याला खऱ्या अर्थाने जर अनमोल करायचं असेल तर ते अनमोल वस्तूशीच जोडायला हवं. याच्या तुलनेत कुठलीच वस्तू अनमोल नाही.

असंच एक उदाहरण या संदर्भात आठवतंय. एक मनुष्य एका वृद्धाश्रमात जातो. तिथे पाहतो व्यवस्था चांगल्या नाहीत. उन्हाळ्यात खूप उकाडा होतोय. तो विचार करतो, की या ठिकाणी आपण पंखे लावून द्यावेत. सर्वांना थंड हवा मिळेल. तो डोनेशन देऊन पंखे लावून घेतो. दुसऱ्यांदा जेव्हा तो तिथे येतो तर पाहतो, की पंखे व्यवस्थित चालू आहेत. सर्वांना गार हवा मिळत आहे; परंतु लोकांना कळणार कसं, की हे पंखे मी लावून दिलेले आहेत! म्हणून त्यावर आपलं नाव टाकायला हवं. तो सगळ्या पंख्यांच्या मध्यभागी असलेल्या गोलाकार भागावर आपलं नाव लिहून घेतो. आपलं नाव पाहून खूप खूश होतो, की आपण किती चांगलं काम केलेलं आहे हे सगळ्यांना कळेल. पुढच्या वेळी जेव्हा तो त्या वृद्धाश्रमात येतो तेव्हा ते पंखे व्यवस्थित फिरत असलेले दिसतात; परंतु त्यावर लिहिलेलं आपलं नाव मात्र पंख्याच्या वेगामुळे वाचता येत नाही. त्यामुळे तो सर्व पंख्यांची बटणं बंद करुन टाकतो. आता पुन्हा उन्हाळ्याचा तो उकाडा सर्वत्र जाणवू लागतो; परंतु तो मात्र खूप खूश आहे. कारण उकाड्याने हैराण झालेला मनुष्य जेव्हा पंख्याकडे पाहील तेव्हा त्याला माझं नाव लिहिलेलं दिसेल, या विचाराने तो अधिकच खूश झाला. आज माणसाची अवस्था त्याहून वेगळी नाही. आपल्या जीवनात स्वतःचंच महत्त्व वाढवलेलं आहे. आपण लोकांसाठी कितीतरी करत आहोत. कितीतरी दानधर्म करत आहोत. आपल्यासारखी सेवा तर कुणीच करत नाही. असा विचार मनात येत असेल तर तो निष्काम सेवाभाव असू शकत नाही.

जेव्हा जेव्हा आपण आपलं जीवन या निराकाराशी जोडू तेवढी मनाची स्वच्छता होत राहील. कारण हा निर्मळ आहे, पावन आहे. जसं एखादा मळलेला कपडा साबण आणि पाण्याने स्वच्छ होतो. तसं हे मलीन मन या परमात्म्याच्या संगाने स्वच्छ होतं, याचा जेवढा जास्त संग करु, सत्संग करु, सेवा आणि नामस्मरण करु तेवढं अधिकाधिक मन स्वच्छ होत जातं. मग या परमात्म्याशी एकरुप अवस्था, मी आणि तू असं कोणतंही अंतर उरत नाही.  जर पाण्यामध्ये एखादा रंग मिसळला तर ते पारदर्शक पाणी त्या रंगाचं होऊन जातं. तो रंग पाण्यापासून कोणीही वेगळा करु शकत नाही. तसं, हा आत्मा परमात्म्याशी ब्रह्मज्ञानाद्वारे एकरुप होतो. त्यासाठी शरीर हे केवळ एक साधन आहे; परंतु या साधनालाच मनुष्य सर्वस्व समजून बसला आहे. त्यामुळे या डोळ्याद्वारे जे जे दिसतं, तेच आपलं जीवन आहे, या मायेलाच तो सत्य मानून बसतो. परमात्माला जाणण्याची जिज्ञासा मनात बाळगत नाही जगामध्ये जन्माला आलोय तर सर्वात मोठा जो उद्देश आहे प्रभु परमात्म्याची प्राप्ती, आत्मा आणि परमात्म्याचं एकत्व निर्माण करणे, ते तर राहून गेलं; परंतु बाकीची सर्व कामं मात्र केली.असं असेल तर मग जीवनात काहीच प्राप्त केलं नाही. प्रत्येकाने याच्याशीच एकरुप होऊन राहावं, याच्या रंगात रंगून राहावं. अशी अवस्था असणारा धन्य आहे. प्रेम, भक्ती, आनंद, स्थिरता, सहजता, जीवनात जेवढी खोलवर येत राहील तेवढं आपण मानवी गुणांनी युक्त होऊ. ◆

# सारं काही स्वतःसाठी

देवधर्म पूजाअर्चा
सारं असतं स्वतःसाठी
देवाला यातलं काही
नको असतं स्वतःसाठी

फुलं अर्पण करतो देवाला
ती काय त्याच्याकडे नाहीत म्हणून ?
सारी पृथ्वीच ज्याचा बगिचा
त्याला काय करायचंय फुलं घेऊन ?

नैवेद्य जो आपण दाखवतो
तो काय देव खातो ?
तो तर स्वतःच प्राणिमात्रांचं
भरणपोषण करीत असतो !

निरांजनाच्या इवल्या ज्योतीने
ओवाळतो आपण प्रभूला
चंद्रसूर्य जातीने
हजर ज्याच्या दिमतीला

स्तोत्रं त्याची गातो ती काय
हपापलाय म्हणून स्तुतीला ?
निर्गुण निराकार जो
त्याला अवडंबर हवंय कशाला ?

सारं काही जे करायचं
ते स्वतःसाठीच असतं करायचं,
प्रार्थनेनं देव बदलत नसतो
स्वतःच स्वतःला असतं सुधारायचं !

कवी : मंगेश पाडगावकर
(साभार)

# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्गुरु बाबाजींचे

प्रश्न : शरीराला आणि मनाला कोणती गोष्ट आवश्यक असते ?

उत्तर : शरीरासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा (घर) आवश्यक असतो, तर मनाला शांती आणि प्रसन्नता आवश्यक असते.

❁ ❁ ❁

प्रश्न : सर्वात सोपी आणि सर्वात कठीण अशी गोष्ट कोणती ?

उत्तर : दुसऱ्याला उपदेश करणे ही सर्वात सोपी गोष्ट आणि त्यानुसार आचरण करणे ही सर्वात कठीण गोष्ट आहे. ज्ञानी महात्म्यांसाठी या दोन्ही गोष्टी सोप्या असतात. जो उपदेश ते जगाला देतात, त्याप्रमाणे आचरण करत असतातय म्हणूनच ते वंदनीय ठरतात. कारण 'बोले तैसा चाले तयाची वंदावी पाऊले.'

❁ ❁ ❁

प्रश्न : मुक्त अशी वस्तू कोणती ?

उत्तर : आत्मा. कारण आत्मा अपरिवर्तनशील आहे. त्यात कधीही बदल घडून येत नाही.याउलट देह, सृष्टी, प्राणिमात्र हे परिवर्तनशील असल्याने ते नाश पावतात.

❁ ❁ ❁

प्रश्न : गुरुला ब्रह्मा–विष्णू–महेश असे का म्हटले आहे ?

उत्तर : ज्याप्रमाणे शास्त्रात म्हटले जाते, की ब्रह्मदेवाकडे सृष्टीनिर्मितीचे कार्य, विष्णूदेवाकडे पालनपोषण करणे, महेशाकडे सृष्टीचा प्रलय करणे ही कार्ये आहेत, त्याप्रमाणे गुरुदेखील अज्ञानी जीवाला ज्ञान देऊन पुनर्जन्म देतो. विष्णुदेवाप्रमाणे भक्ताचं नित्यप्रती रक्षण करुन त्याचा पाठीराखा बनतो. तसेच महेशाप्रमाणे भक्ताच्या जीवनातील अविद्या, त्रिविध ताप, षड्विकार यांचा नाश करतो.म्हणूनच गुरुला ब्रह्मा–विष्णु–महेशाची उपाधी जोडली जाते. वास्तविक ही तिन्ही कार्ये एकाच परमात्म्यामुळे घडत असते.


❁ ❁ ❁



# शब्दकोडे

## २१८

○ विकास अरोडा ( रेवाडी-हरियाणा )



## आडवे शब्द

३. काकाची बायको
४. रामायणातील लव-कुश यांची माता
५. पंडित जवाहरलाल नेहरुंचे घोषवाक्य : आराम ....... है
६. रोख पैसे, रोकड
७. वादळी पावसात आकाशातून पडणारे बर्फाचे खडे
८. ....... येथे हसती दुनिया मराठीचे मुंबईमधील कार्यालय आहे
९. आजोबांचे वडील
११. दहा कोन असलेली आकृती
१३. महाराष्ट्र राज्याची राजभाषा
१५. अभिमन्यूचा मुलगा

## उभे शब्द

१. तरुणपणचा विरुद्धार्थी शब्द
२. सरदार पटेल इंटरनॅशनल एअरपोर्ट कोठे आहे ?
३. १ मे हा दिवस ....... दिन म्हणूनही साजरा केला जातो
९. सूर्य मावळतो ती दिशा
१०. पुण्याजवळील एक धरण ज्याला तानाजी सागर धरण असेही म्हणतात
१२. प्रभू श्रीरामाला उष्टी बोरं देणारी भक्त
१४. पहिला मराठी बोलपट : अयोध्येचा .....

उत्तरे इतरत्र



## कुतुहल

### ❁ पेटत्या निखाऱ्यांवर कसे चालतात ?

गावोगावी जत्रा भरतात. काही ठिकाणी ग्रामदैवतांच्या वार्षिक उत्सवाच्या असतात. अशा काही काही जत्रेमध्ये मातीत एक खड्डा करुन त्यात होळीसारखी आग पेटवतात आग धूमसून तिचे निखारे झाले, की त्यावरुन काही लोक अनवाणी पायाने चालत जातात. देवाधर्मावर ज्यांची श्रद्धा आहे. अशा कोणालाही हे शक्य असल्याचं सांगितलं जातं. भाविक बायाबापड्यांचा त्यावर विश्वासही बसतो. खरं पाहिलं तर यात श्रद्धा व अश्रद्धेचा कोणताही सहभाग नसतो. भौतिकशास्त्रातील काही तत्त्वांचा विचार करता, ही करामत कशी काय साध्य केली जाऊ शकते याचा उलगडा होतो. साधारणपणे त्या निखाऱ्यांवरून चालण्यापूर्वी पाय व्यवस्थित धुवायला सांगितलं जातं. त्यामुळे पाय चांगले ओले राहून तळपायावर पाण्याचा पापुद्रा चिकटून राहतो. आगीवर चालायला लागलं की निखाऱ्याच्या उष्णतेमुळे त्या पाण्याची वाफ होते. वाफेचं एक कवचच मग तळपायाभोवती राहतं. अशी वाफ उष्णतेची वाहक नसते. त्यामुळे खालच्या आगीच्या उष्णतेची झळ पायापर्यंत पोचत नाही. तेवढा वेळ वाफेचं कवच तळपायाला संरक्षण देण्यास पुरेसं ठरतं. शिवाय आगीवरुन चालताना कोणीही रमतगमत चालत नाही. झपझप चालत राहतं. त्यामुळे तळपाय निखाऱ्यांवर जितका वेळ राहतात त्यापेक्षा जास्त वेळ ते हवेत राहतात. उष्णतेपासून दूर असतात. झपझप चालण्यामुळे निखाऱ्यांवर घालवायचा एकूण काळही कमी असतो. साधारण तीन सेकंदाच्या आत पाय उचलला तर चटका लागत नाही. ◆

संग्राहक – रुपाली शिंदे (अंबरनाथ)



# आजोबा

चित्रांकन व लेखन : अजय कालरा




त्या शूर बालकाचं नाव होतं वीर. तो अतिशय निडर आणि धैर्यवान होता. तो इतर मुलांसारखा अंधाराला किंवा अन्य कुठल्या वस्तूला घाबरत नव्हता.
एके दिवशी अचानक त्याच्या आजीची तब्येत बिघडली; परंतु त्याचवेळी त्याच्या आई–वडिलांना गावाला जावं लागलं होतं.
त्याची वार्षिक परीक्षा जवळ आली होती. त्यामुळे तो आई–बाबांबरोबर गावी जाऊ शकला नव्हता. नाईलाजाने त्याच्या आई–बाबांना त्याला घरी ठेवून जावं लागलं.


रात्री जेव्हा तो झोपण्यासाठी बेडवर गेला, त्याच वेळी त्याला घराच्या छतावर कोणीतरी चालण्याचा आवाज आला.
या संकटाचा मुकाबला करण्यासाठी त्याने पटकन एक युक्ती योजली.
तो स्वयंपाक घरात गेला. त्याने एक डबा उघडला मूठभर मिरची पावडर घेऊन तो पटकन जिन्याखाली लपला. चोर छतावरून खाली आला. जिना उतरू लागताच त्याने मिरचीची पूड चोराच्या डोळ्यात फेकली. अचानक झालेल्या या प्रकाराने चोर गोंधळून गेला. डोळ्यांची आग झाल्यामुळे त्याला काही सुचेना.


बापरे! एवढा धाडसी आणि हुशार होता वीर?
होय बाळांनो. इकडे डोळ्यांची आग होत असल्याने चोराला कुठेही पळता येईना. वीरने लगेच पोलिसांना फोन केला.
एवढंच नाही, तर चोर पळून जाऊ नये म्हणून त्याने घराला बाहेरून कडी लावून घेतली.
याचा अर्थ आम्ही देखील आमच्या मनातली भीती काढून टाकली आणि समजुतदारपणा दाखवत एखादं काम धीटपणे केलं तर शूर बालक पुरस्कार आणि बक्षीस आम्हीही मिळवू शकतो.....
अगदी बरोबर...



कथा

# दैव देते आणि कर्म नेते

एकदा एक भिकारी रस्त्याने भीक मागत जात होता; परंतु त्या दिवशी त्याला गावात कोणीही भिक्षा घातली नाही. त्यामुळे तो खूप दुःखी झाला. देवाला दोष देत मोठमोठ्याने रडत ओरडत चालला होता. त्याचवेळी एक साधू त्या मार्गाने जात होता. भिकाऱ्याचे शब्द कानी पडताच साधूला त्याची दया आली. साधू भिकाऱ्याला म्हणाला, "तुला मी हा एक दगड देतो, याला परिस म्हणतात, बाजारात जाऊन चांगल्या प्रतीचं लोखंड घेऊन ये आणि त्याला हा परिस लाव म्हणजे त्याचं सोन्यात रुपांतर होईल. ते विकून खूप पैसा मिळेल तुला कुठल्याही प्रकारची अडचण राहणार नाही. तुझं कल्याण होईल; परंतु तिसऱ्या दिवशी मात्र हा परिस आपोआपच अदृश्य होईल. तो अदृश्य होण्याच्या आतच तू हे कार्य करुन घे."

भिकाऱ्याने परीस हाती घेतला खरा; पण त्याच्या मनात शंका आली, की हा दगड खरंच आपलं कल्याण करणार आहे का? आज देवांनं तर आपली घोर चेष्टा चालवलेली आहे. या दगडाऐवजी अर्धी भाकर तरी दिली असती. उदास होत तो आपल्या झोपडीकडे निघाला. दुसऱ्या दिवशी पुन्हा खायला काही मिळतं का म्हणून दारोदार हिंडू लागला. त्या दिवशी त्याला भरपूर भिक्षा मिळाली. रात्री उपास घडल्यामुळे तो पोटभर जेवला आणि

(पान २२ वर)



# खरे सोबती

एका जंगलात एक हिरवंगार आंब्याचं झाड होतं. त्या झाडावर अनेक पक्षी राहत होते. एके दिवशी एक शिकारी आला. आंब्याच्या झाडाखाली उभ्या असलेल्या हरणावर त्याने नेम धरला; परंतु त्याचा नेम चुकला आणि तो विषारी बाण हरणाला लागण्याऐवजी झाडाला लागला. त्या बाणाचे विष झाडामध्ये पसरु लागले. हळूहळू झाडाची पानं गळून गेली. एवढा मोठा विशाल वृक्ष; परंतु निस्तेज आणि चैतन्यहीन झाला. त्याच वृक्षाच्या ढोलीत एक पोपट राहत होता. त्याचे त्या झाडावर अतिशय प्रेम होते. झाड सुकल्यामुळे सारे पक्षी उडून दुसऱ्या ठिकाणी आश्रयाला गेले; परंतु पोपट मात्र त्या झाडावरच राहिला. प्राण गेला तरी चालेल; पण मी या वृक्षाला सोडून जाणार नाही असा त्याचा निश्चय होता. त्याचा त्याग, अतूट मैत्री, झाडाविषयी कृतज्ञतेचा भाव पाहून देवराज इंद्र तिथे प्रकट झाले. ते म्हणाले, "हे शुकराज! या झाडावर आता पालवी येणं शक्य नाही. आता हा वृक्ष सोडून दुसऱ्या हिरव्यागार फळांनी भरलेल्या कुठल्याही वृक्षावर जाऊन राहा. येथे राहून विनाकारण का जीव गमवतोस?" पोपट म्हणाला,'' हे देवेंद्र! मी या झाडावर जन्मलो. लहानाचा मोठा झालो. या झाडाने माझं पालनपोषण केलं. रक्षण केलं. मग आता

हा वृक्ष संकटकाळामध्ये असताना मी माझ्या सुखासाठी दुसरीकडे का जाऊ? ज्याच्याबरोबर मी सुख भोगले, त्याच्याबरोबर मी दुःख देखील भोगेन. त्यातच मला आनंद आहे.“ पोपटाचे बोलणे ऐकून इंद्रदेव प्रसन्न झाले. ते म्हणाले, ”हे शुकराज! मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला जो पाहिजे तो वर माग. तुझ्यासाठी मी काय करु ते सांग. पोपट म्हणाला, ”हे देवेंद्र! जर तुम्हाला मला काही द्यायचंच असेल तर एवढंच द्या, की हा वृक्ष पुन्हा पूर्वीसारखा हिरवागार फळाफुलांनी डवरलेला असावा. इंद्रदेव म्हणाले, ”तथास्तु!“ तो वृक्ष पुन्हा पूर्वीसारखा फुलाफळांनी बहरला.

तात्पर्य, सुखाचे सोबती सारेच असतात; परंतु दुःखात जे खंबीरपणे पाठीशी उभे राहतात तेच खरे आपले सोबती असतात. ◆

## दैव देते आणि कर्म नेते

(पान २० वरुन)

झोपून राहिला. लोखंड आणून त्याचं सोनं बनवायचाही प्रयत्न केला नाही. दुसऱ्या दिवशी देखील थोडीफार भिक्षा मिळाली त्यात समाधान मानून तो झोपून राहिला. खूप सारे पैसे साठले की मग लोखंड आणू असा विचार करत तो बसून राहिला. साधूने सांगितल्याप्रमाणे तिसऱ्या दिवशी परीस आपोआप अदृश्य झाला. भिकारी हताश झाला. आता पश्चात्ताप करुनही काही फायदा नव्हता. भिकारी शेवटी भिकरीच राहिला.

म्हणतात ना, ‘दैव देतं; पण कर्म नेतं.’

ब्रह्मज्ञान हे देखील परिसासमान अनमोल आहे, त्याचा जीवनात उपयोग केला, तरच जीवनाचं सोनं होतं. यासाठी गुरुवर श्रद्धा आणि विश्वास ठेवून कर्म केलं पाहिजे. ◆

# प्रत्येक ऋतूत रंग बदलणारी नदी



कोलंबियामध्ये कानो क्रिस्टल्स नावाची एक अदभूत नदी आहे. ही नदी प्रत्येक ऋतुत नवनवीन रंग धारण करते. ती कधी लाल तर कधी निळी दिसते तर कधी हिरवी, त्यामुळे या नदीला ‘लिक्विड रेनबो’ म्हणजेच ‘इंद्रधनुष्यी पाण्याची नदी’ असेही म्हटले जाते.

या नदीच्या अशा रंगांचे कारण म्हणजे तिच्या पात्रात असलेल्या विशिष्ट वनस्पती. या वनस्पतींचे शास्त्रीय नाव मॅकेरीनिआ क्लॅविगेरा असे आहे. या वनस्पती, पाण्याची खोली व सूर्यप्रकाश यांचा एकत्रित परिणाम होऊन नदीच्या पाण्याला वेगवेगळा रंग येत असतो. अर्थात, नदीच्या रंगामधील विज्ञानाशी सर्वसामान्यांना काही देणेघेणे नसते. तेही सुंदर रंगीबेरंगी नदी पाहण्यासाठी येत असतात. जून ते डिसेंबरपर्यंत ही नदी पर्यटकांना पाहता येते. जानेवारी ते मेपर्यंत तिथे पर्यटकांना बंदी असते. येथील तीस किलोमीटरच्या क्षेत्रावर कोलंबियन लष्कराचा ताबा आहे. एका दिवसात केवळ दोनशे जणांना तिथे जाण्याची परवानगी मिळते. ◆




# शांतीकालीन वीरता पुरस्कार

पुरस्कार या सदरामध्ये आपण शौर्य पुरस्कार पाहिले. आता आपण शांतीकालीन वीरता पुरस्कार याविषयी माहिती पाहणार आहोत.

अशोकचक्र, कीर्तीचक्र आणि शौर्यचक्र हे तीन पुरस्कार शांती काळातील कामगिरीसाठी दिले जातात. शांती काळ म्हणजे दहशतवादी हल्ला, नैसर्गिक आपत्ती किंवा इतर काही प्रसंग. शांती काळातील या पुरस्कारांसाठी भारताच्या तिन्ही सशस्त्र व राखीव दलातील सैनिक, सैनिकांच्या सेवा करणारे परिचारिक, पोलीस आणि सामान्य नागरिक पात्र असतात.

१९६७ पासून या पदकांची नावे अशोकचक्र, कीर्तीचक्र आणि वीरचक्र अशी ठेवण्यात आली. या तिन्ही पदकांची रचना सारखीच असते. पदकाच्या गोलाकार भागावर मध्यभागी अशोकचक्र चक्राच्या आजूबाजूला कमळाची गोलाकार माळ असते.

अशोकचक्र : शांतीकाळातील शौर्याचा हा सर्वोच्च सन्मान आहे. परमवीर चक्राच्या समकक्ष याचं महत्त्व आहे. कांस्य धातूपासून बनवलेल्या अशोक चक्रावर सोन्याचा मुलामा दिलेला असतो. अशोकचक्रासोबत बत्तीस मिलिमीटर रुंदीची हिरव्या रंगाची फीत वापरली जाते. मध्यभागी दोन मिलिमीटर नारंगी रंगाची रेषा असते. आजपर्यंत ९२ वीरांना अशोकचक्राने सन्मानित करण्यात आले आहे. १९८६च्या विमान अपहरणात प्रवाशांचा जीव वाचवताना वीरगतीला प्राप्त झालेली विमानसेविका निरजा भानोत, अंतराळात जाणारा पहिला भारतीय राकेश शर्मा, २००८ साली मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलीस दलातील अशोक कामटे, हेमंत करकरे यांना अशोकचक्राने सन्मानित करण्यात आले.

कीर्तीचक्र : कीर्तीचक्राचे महत्व महावीरचक्रासारखंच आहे. कीर्तीचक्र चांदीपासून बनवले जाते. याच्यामध्ये तीस मिलिमीटर रुंदीच्या हिरव्या रंगाची फीत वापरली जाते. मध्ये नारंगी रंगाच्या दोन रेषा असतात. आजपर्यंत ५१२ वीरांना कीर्तीचक्रांनी सन्मानित करण्यात आले आहे.

शौर्यचक्र : शौर्यचक्र आणि वीरचक्राचा दर्जा समान आहे. शौर्यचक्र हे कांस्य धातूपासून बनवले जाते. याच्यासोबत तीस मिलिमीटर रुंदीच्या हिरव्या रंगाची फीत वापरली जाते. ही चार समान भागात विभागलेली असते. आजपर्यंत २२५५ वीरांना शौर्यचक्राने सन्मानित करण्यात आले आहे. ◆

संग्राहक – निलेश माने (अंबरनाथ)



# देव कुठे आहे...?

एकदा खेत्रीचे महाराज अजितसिंग स्वामी विवेकानंदांशी ईश्वराविषयी चर्चा करत होते. स्वामीजी म्हणाले, देव निर्गुण–निराकार असून सर्व विश्वात व्यापलेला आहे. देव मूर्तीतही आहे; पण मूर्ती म्हणजे देव नाही.या वाक्याचा बोध न झाल्याने महाराजांनी स्वामीजींना प्रश्न विचारला, ''स्वामीजी मूर्तीत जर देव आहे, तर मग मूर्ती देव का नाही?'' स्वामीजींनी सभोवार नजर टाकली. समोरच्या भिंतीवर त्यांना महाराजा अजितसिंग यांचे तैलचित्र (फोटो) लावलेलं दिसलं. त्यांनी शिपायाला ते चित्र आणायला सांगितलं. शिपायाने महाराजांचे चित्र स्वामींकडे दिलं. स्वामीजींनी ते चित्र जमिनीवर ठेवत शिपायाला सांगितलं, ''या चित्रावर पाय ठेव.'' शिपाई दचकून म्हणाला, स्वामीजी, मी या चित्रावर पाय कसा ठेवू? हे तर आमच्या महाराजांचं चित्र आहे. त्यावर स्मितहास्य करत स्वामीजी म्हणाले, ''पहिलंत महाराज! ही केवळ तुमची प्रतिमा आहे, म्हणून त्याला आदर आहे. या प्रतिमेत तुम्ही आहात असं जरी सारे म्हणत असले, तरी तुम्ही म्हणजे प्रतिमा नव्हे. या प्रतिमेचा सत्कार केला काय किंवा त्याचे तुकडे–तुकडे केले काय, त्याच्यावर कुठलाही परिणाम होणार नाही. त्याप्रमाणेच मूर्ती जरी देवाची असली तरी मूर्ती म्हणजे देव नाही. मूर्ती तुटू शकते, फुटू शकते; परंतु देव हा तुटत नाही, फुटत नाही. देव अखंड, अनंत, अचल, अभंग आहे. महाराज, केवळ आपल्यावरील श्रद्धेमुळे आदरामुळे जसा आपल्या प्रतिमेचा आदर केला जातो, तसा देवावरील श्रद्धेमुळे देवाच्या प्रतिमेचा, मूर्तीचा आदर केला जातो एवढंच! परंतु माणसाने या चराचरात सृष्टीत व्यापलेल्या परमेश्वराला जाणणे गरजेचे आहे. ईश्वराचं अस्तित्व सर्वत्र भरुन राहिलेलं आहे. ही समस्त चर–अचर सृष्टी ईश्वरी सत्तेनेच बनलेली आहे.

स्वामीजींच्या या समजावण्याने खेत्रीच्या महाराजांचं पूर्ण समाधान झालं. पुढे याच महाराजा अजितसिंगांनी अमेरिकेतील सर्वधर्म परिषदेत सहभाग घेण्यासाठी स्वामीजींना मोठी आर्थिक मदत केली. ◆

# प्रेम, ज्ञान आणि कर्म



जे एका क्षणात कमी होतं आणि दुसऱ्या क्षणी वाढतं, त्याला प्रेम म्हणत नाहीत. प्रेम नेहमी एकसमान असतं. ज्याप्रमाणे मातेचं प्रेम बालकासाठी एकसमान असतं त्याप्रमाणे भक्त आणि भगवंत यांचं प्रेम देखील एकसमान असतं. भक्त नेहमी या प्रभू परमात्म्याचेच असतात. दुःखाच्या प्रसंगी त्यांचा मालक कोणी वेगळा आणि सुखामध्ये कोणी वेगळा, असं नसतं. त्यांची दृष्टी अशी बनलेली असते, की प्रभूच्या इच्छेमध्ये राहूनच ते जीवनयात्रा पूर्ण करतात. कारण त्यांना माहिती असतं, की हे येणं–जाणं काय आहे? कमावणं आणि गमावनं काय आहे? ही तर सारी या प्रभू–दातारचीच कृपा आहे. हा दातारच सर्व काही करणार आहे. म्हणून त्याच्यापुढे ते सदैव नतमस्तक होत असतात. हेच एक रहस्य आहे. हेच एक आनंदमय जीवन जगण्याचं सार आहे. म्हणूनच संत महापुरुषांनी ज्ञान प्राप्त केलेलं आहे. हे अनमोल ज्ञान प्राप्त तर केलं; पण त्याचं जतन केलं पाहिजे. ते सांभाळलं पाहिजे. प्रभूच्या जाणीवेत, अनुभूतीत प्रत्येक क्षण व्यतीत केला पाहिजे. प्रत्येक क्षणी आपलं लक्ष, ध्यान या प्रभूकडे लागलेलं असावं. कोणत्याही गोष्टीकडे पाहताना ज्ञानदृष्टीने पाहावे. कारण त्याच्यानेच आपल्या मनामध्ये प्रेम वाढेल. सत्काराचा भाव वाढेल. करुणा वाढू लागेल. सारे जर आपलेच वाटू लागले तर मग द्वेषभावना कुठून येणार? घृणा कशी वाटणार? सर्वत्र प्रेमच प्रेम दिसेल. फुलासारखी सुंदर आणि सुगंधी भावना निर्माण होईल. दातार कृपा करो, सर्वजण ज्ञानाशी जोडून राहावोत. या सत्याचं अनुकरण–अनुसरण आपल्या वागणुकीतून, कर्मातून, जीवनातून करत राहोत.

ज्याप्रमाणे सुईमध्ये आपण धागा ओवतो तेव्हा सुई जशी जशी पुढे जाते त्याप्रमाणे तो धागा सुईच्या मागोमाग जात असतो. तसेच जोपर्यंत सुईमधे धागा आहे तो पर्यंत सुई हरवण्याचा प्रश्नच येत नाही. अशा प्रकारे जर ज्ञानाचं अनुकरण अनुसरण कर्माद्वारे होत असेल तर हे ब्रह्मज्ञान हरवण्याचा किंवा लुप्त होण्याचा प्रश्नच येत नाही. सुई जर एकटी कुठे पडली तर ती शोधावी लागते; पण जर धाग्यासह कुठे पडली तर ती लगेच दिसून येते. अशा प्रकारे आपला व्यवहार, आपलं कर्म जेव्हा या ज्ञानाशी जोडलेलं असतं तेव्हा हा परमात्मा देखील दृष्टीआड होत नाही. ◆


# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


अनन्या विचारे


वंश विचारे


आस्था शर्मा


सात्विक कळसकर



रुहान बोऱ्हाडे


जान्हवी मिसाळ


सुयोग शेलार


रुत्विक पावसकर


शौर्य बळकटे


प्रेरिका भिसे


श्रेयांश दुकरुल


स्वराज गाडे


शौर्य पवार


आरुष दिवे


मंथन काळे


अव्यान सावळे


अद्विक घाडी


हार्दिक गायकवाड



देवांश यादव


श्रीशा सुर्यवंशी


तीर्था नेवरेकर


श्राव्या शिंदे



सुदीक्षा जाधव


भक्ती इंगळे


कणिका इंगळे


दिया कारंडे


रेवंशी इंगळे


अनन्या लोहार



भ्रमंती

# मिनी महाबळेश्वर- दापोली

कोकणात आणि थंड हवेचं ठिकाण?... कोकणात थंड हवेचं ठिकाण कसं असू शकेल? परंतु मित्रांनो, कोकणात जरी दमट हवामान असलं तरी दापोली हे शहर थंड हवेचं ठिकाण म्हणूनही प्रसिद्ध आहे. म्हणूनच मुंबईपासून २१५ किलोमीटर अंतरावर असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील या शहराला 'मिनी महाबळेश्वर' म्हणून देखील ओळखले जाते. मुंबई-गोवा महामार्गावरील खेड शहरापासून पस्तीस किलोमीटर अंतरावर दापोली आहे. २०० वर्षांपूर्वी इंग्रजांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत दापोली कॅम्प वसवले. पूर्वीच्या काळी खोत हे ब्रिटिश सरकारचे नोकर असत. दापोली जवळच २८ किलोमीटरवर दाभोळ हे बंदर आहे. येथे एन्रॉन वीज प्रकल्प आहे. मंडणगड पासून साधारणता बारा किलोमीटर अंतरावर दापोली तालुक्यात पालगड हे पूज्य साने गुरुजींचं जन्मगाव आहे. येथे त्यांचं स्मारक आहे. त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग छायाचित्रांच्या रुपात प्रदर्शित करण्यात आले आहेत. हर्णे बंदरापासून साधारण एक किलोमीटर अंतरावर सुवर्णदुर्ग किल्ला आहे.

दापोली शहर व ग्रामीण भाग सह्याद्रीच्या पायथ्याच्या खेड रांगेतून वेगळा आहे. किनारपट्टी इतर भागापेक्षा भिन्न आहे. उत्तरेला भारजा नदी दक्षिणेला वशिष्ठी नदी आहे. हिरव्यागार डोंगर रांगांवर टिपक्यांसारखी दिसणारी घरं. मोकळी हवा. विविधरंगी पुष्पसौंदर्य हे दापोली शहराचे वैशिष्ट्य आहे. गजबजाटापासून दूर निसर्गाचं वरदान लाभलेल्या या शहराचं सौंदर्य पर्यटकांसाठी आकर्षणाचं केंद्र बनलेलं आहे. ऐतिहासिक गड–किल्ले आणि इमारतींसाठी दापोली तालुका प्रसिद्ध आहे.

मंडणगडहून कोकण भ्रमंती सुरु केल्यास केळशी, आंजर्ले, मुरुड मार्गे दापोलीला येता येते. येथे कृषी प्रदर्शन व कृषी पर्यटन केंद्र विकसित करण्यात आले आहे. भारतातील सर्वात मोठे कृषी विद्यापीठ येथे आहे. पेशवेकालीन वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेले केशवराज मंदिर येथे आहे. येथील गरम पाण्याचे झरे, फतेहगड, कणकदुर्ग, सुवर्णदुर्ग हे किल्ले, नारळी सुपारीच्या बागा, मंदिरं, गुहा इ. गोष्ट पाहता येतील पर्यटकांना आकर्षित करतात.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या आणि निळ्याशार समुद्रालगत असणाऱ्या दापोलीत राहण्यासाठी देखील उत्तम सोयी आहेत. खेड हे जवळचं रेल्वे स्टेशन आहे. ◆



**लेखकांना निवेदन**

संत निरंकारी मिशनची कोणतीही पत्र-पत्रिका जसे, 'संत निरंकारी', 'हसती दुनिया', 'एक नजर' इत्यादित आपण आपले लेख, कविता, गीत, डिझाईन इत्यादी द्वारा योगदान देऊ इच्छिता, तर आपल्या लेखन संबंधित संक्षिप्त विवरण (प्रोफाईल) खाली दिलेल्या ई-मेल आयडी वर पाठवावे. hduniya.marathi@nirankari.org आणि cc to sn.new@nirankari.org

# हसा मुलांनो हसा



शिक्षक : मुलांनो आपण घरी रोज जेवणात डाळ–भात खातो त्या डाळीत प्रथिने किती असतात ?
बंडू : सर, आपल्या घरच्या कोंबडी एवढे !
शिक्षक : ते कसे काय ?
बंडू : सर, मोठी माणसं नेहमीच म्हणतात, 'घरकी मुर्गी दाल बराबर'

रमाकाकू : ए केळीवाला ! केळी कशी डझन दिली ?
केळेवाला : सुट्टी केळी दहा रुपये आणि फण्यातील २० रुपये डझन.
रमाकाकू : चल, हे घे दहा रुपये आणि या फण्यातील एक डझन केळी सुट्टी करुन दे.

शिक्षक : मुलांनो, आपल्या वडलांच्या नावामागे नेहमी 'श्री' लावत जावे. बाळ नंदू, सांग बरं तुझ्या वडीलांचं नाव काय ?
नंदू : श्रीमतीराम
शिक्षक : गधड्या, वडीलांच्या नावाच्या मागे 'श्री' लावावे आणि आईच्या नावाच्या मागे 'श्रीमती' लावावे.
नंदू : सर, पण माझ्या वडीलांचं नाव मतीराम आहे.

पिंकी : ताई, माझे दात इतक्या लवकार का पडले ?
ताई : अग पिंकी, आपल्याला पहिल्यांदा जे दात येतात त्यांना दुधाचे दात असे म्हणतात. सहा–सात वर्षांनी ते पडून जातात आणि नंतर त्यांच्या जागी मजबूत दात येतात.
पिंकी : म्हणजे, आपल्या आजीचे सुद्धा काही दिवसांनी पुन्हा दात येतील ?

भिकारी : माई, भिक्षा वाढा.
उर्मिला काकू : काय रे मेल्या, तू इतका धडधाकट आहेस तुला काही कामधंदा करुन खाता येत नाही का ?
भिकारी : काय करणार माई ! माझा दिवसभरातील सगळा वेळ भीक मागण्यातच जातो, मग कामधंदा कधी करायचा ?

डॉक्टर : आजीबाई, ही गोळी डोकेदु:खीची आणि ही गोळी कंबरदु:खीची आहे, रात्री झोपतांना घ्या.
आजीबाई : दोन्ही गोळ्या एकदमच घ्यायच्या का ?
डॉक्टर : हो !
आजीबाई : अहो, मग ह्या गोळ्यांना कसं कळणार डोके दु:खीकडे कुणी जायचं आणि कंबरदु:खीकडे कुणी जायचं ते?

गणपतराव : काय बन्या, पुढे कशात करीयर करणार ?
बन्या : राजकारणात.
गणपतराव : का बुवा ?
बन्या : राजकारणात सीईटी किंवा एंट्रन्स एक्झाम द्यावी लागत नाही म्हणून.

शिक्षक : (तोंडी परीक्षा) मुलांनो, मी विचारलेल्या प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे द्या. दिनू ,सांग उंटाला वाळवंटातील जहाज का म्हणतात ?
दिनू : सर, मला पूर्ण वाक्यात उत्तर देता येत नाही. अर्धच वाक्य येतं.
शिक्षक : ठीक आहे, अर्ध तर अर्ध... पण दे!
दिनू: ................................ म्हणून उंटाला वाळवंटातील जहाज म्हणतात.

आरोग्यमंत्री : गावकरी बंधूनो, तंबाखू खाणं, सिगारेट ओढणं आरोग्याला हानिकारक आहे हे मी गेली अनेक वर्षे सांगत आलो आहे. त्यामुळे आपल्या देशातील हजारो लोकानीं तंबाखू, सिगारेट ओढणं कायमचं सोडून दिलं.
गावकरी : काय म्हणता काय ? खरं सांगताय ?
मंत्र्यांचा पी.ए. : होय, साहेब सांगतात ते अगदी खरं आहे. आतापर्यंत हजारो माणसं सिगारेट ओढल्याने मेली, त्यांनी सिगारेट ओढणं कायमचं सोडून दिलंय.







# संतांची समदृष्टी

एकदा संत एकनाथ महाराज एका गावी जात होते. त्यांनी पाहिलं, की रस्त्यावर काही लोक लाठ्या–काठ्या घेऊन उभे आहेत. नाथ पुढे गेले. तेव्हा त्यांना एक काळा नाग फणा काढून बसलेला दिसला. लोक लाठ्या घेऊन त्याला मारण्यासाठी जमले होते. नाथांनी सर्वांना थांबवत म्हटले, "बंधूंनो, तुम्ही या सापाला का मारत आहात? हा बिचारा तर आपल्या पूर्वकर्मामुळे साप बनला आहे. याच्यातही तुमच्या माझ्यात आहे तोच आत्मा आहे." त्यावर एक गृहस्थ म्हणाला, "मग तो आपल्याला का चावतो?" नाथ म्हणाले, "आपण जर त्याला त्रास दिला नाही, तर हा सुद्धा तुम्हाला चावणार नाही. त्याच्या–मध्येही भगवद्स्वरुप पाहा." नाथांसारख्या संतपुरुषांचे म्हणणे ऐकून लोकांनी सापाला सोडून दिले. थोड्या वेळाने साप आपल्या मार्गाने निघून गेला. नाथांचा मुक्काम काही दिवस त्याच गावात होता.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून एकनाथ महाराज स्नानासाठी नदीवर जात होते. त्यावेळी त्यांच्या वाटेत तोच भयंकर काळा साप फणा काढून बसला होता. नाथांनी त्याला हात जोडून प्रार्थना केली, की माझ्या वाटेतून दूर हो; परंतु तो जागेवरुन हलला

(पान ३४ वर)





# स्वामीजींचा परखडपणा

अमेरिकेतील सर्वधर्म परिषदेनंतर स्वामीजींना अमेरिकेत तसेच युरोपमध्ये खूप लोकप्रियता लाभली होती.

स्वामीजी इंग्लंडच्या दौऱ्यावर असतानाचा हा प्रसंग आहे. त्यावेळी स्वामीजी लंडन शहरामध्ये दररोज सायंकाळी प्रवचन देत असत. त्यांच्या प्रवचनातील स्पष्टवक्तेपणा, प्रेम, नम्रता या दैवी गुणांचा श्रोत्यांवर चांगला प्रभाव पडला होता.

स्वामीजींच्या प्रवचनांना लंडनमध्ये खूप लोकप्रियता लाभली. श्रोते अत्यंत एकाग्र होऊन स्वामीजींचं प्रवचन ऐकत असत; परंतु अनेकदा चांगल्या गोष्टींना काही जणांकडून विरोधही होत असतो.

असंच एकदा स्वामीजींचं प्रवचन चालू असताना एक गृहस्थ स्वामीजींवर विनाकारणच वायफळ टीका करु लागला.

स्वामीजींनी सुरुवातीला त्याच्याकडे दुर्लक्ष केलं आणि आपलं प्रवचन चालूच ठेवलं. खरं म्हणजे श्रोत्यांनाही त्या माणसाचा खूप राग येत होता; पण स्वतः स्वामीजी त्याच्याकडे दुर्लक्ष करत आहेत हे पाहून

श्रोतेही शांत बसले आणि स्वामीजींचा एक एक शब्द मनात साठवू लागले.

आपल्याला स्वामीजी काही किंमत देत नाही हे बघून तो गृहस्थ मनातल्या मनात चरफडत अधिकच असभ्य वर्तन करू लागला. स्वामीजींनी आपल्या प्रवचनामध्ये बुद्धांना वंदन केलं. त्यावर त्याने लगेच बुद्धांवर टीका करायला सुरुवात केली. स्वामीजींनी संन्याशांची स्तुती करताच त्याने संन्याशांची निंदा करायला सुरुवात केली. त्यांच्याविषयी अपशब्द वापरु लागला. तरीही स्वामीजी शांतच राहिले. स्वामीजी बंगाली आहेत हे त्याला समजल्यावर तो बंगाली लोकांची बदनामी आणि ब्रिटिशांची स्तुती करु लागला.

असे वारंवार घडू लागले. आता मात्र स्वामीजींनी आपल्या प्रवचनात ब्रिटिशांच्या अमानुष वर्तनाचे, भारतीय जनतेवर त्यांनी केलेल्या अन्यायाचे अनेक दाखले पुराव्यासह देत त्या टीकाकाराचा चांगलाच समाचार घेतला. आता मात्र तो निरुत्तर झाला. एका निर्भय भारतीय संन्याशाने ब्रिटिशांच्याच राजधानीमध्ये जाऊन आपल्या परखड शब्दात ब्रिटिश टीकाकाराचं तोंड कायमचं बंद केलं.

त्यानंतर स्वामीजी सहजपणे प्रवचनाच्या मूळ विषयाकडे वळले आणि आपल्या प्रवचनाचा शेवट त्यांनी अशा तऱ्हेने केला, की जणू काही घडलेच नाही! स्वामीजींचा निडरपणा, स्पष्टवक्तेपणा आणि वाकचातुर्य बघून सारे श्रोते अवाक झाले.

त्यानंतर मात्र स्वामीजींच्या विरोधात अवाक्षरही काढण्याची हिंमत कुणाला झाली नाही. ◆

## संतांची समदृष्टी (पान ३२ वरुन)

नाही. शेवटी नाथांनीच आपला मार्ग बदलला आणि ते दुसऱ्या घाटावर स्नानासाठी निघून गेले. आंघोळ करून जेव्हा ते परतले, तेव्हा उजाडले होते. रस्त्याने येता येता जिथे साप बसला होता त्या ठिकाणी ते आले. तेव्हा त्यांना दिसून आलं, की जिथे साप बसला होता, त्याच मार्गावर पुढे खूप मोठा खोल खड्डा होता. जर सापाने त्यांना पुढे जाण्यापासून रोखले नसते तर ते अवश्य त्या खड्ड्यात पडले असते; परंतु सापाने एक प्रकारे त्यांच्या उपकाराची परतफेडच केली होती. संत महापुरुष सर्वांमध्ये ईश्वराचे दर्शन करतात. त्यामुळेच विषारी प्राणी सुद्धा आपला हिंसक स्वभाव विसरुन जातात. अशी असते संतांची समदृष्टी. ◆

॥ साधना ॥

टी.व्ही. वर
प्रत्येक मंगळवार व गुरुवार,
सकाळी ७.०० ते
७.३० वाजेपर्यंत
सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज
आणि बाबा हरदेवसिंहजी
महाराजांच्या
प्रवचनांचे प्रसारण

# उत्तम आरोग्यासाठी आणि सौंदर्यवर्धक लिंब



उन्हाळयाच्या दिवसांमध्ये तर लिंबाचा खूप मोठया प्रमाणात वापर केला जातो कारण लिंबाचा वापर केल्याने आपल्याला उष्णतेचा त्रास देखील बऱ्याच अंशी कमी प्रमाणात होतो.

सकाळी सकाळी अनाशेपोटी लिंबुपाणी पिऊनच आपल्या दिवसाची सुरुवात केल्यास, उन्हाळ्याच्या दिवसात आपल्याला हवी असेल तेवढी ऊर्जा पुरवण्याचे सामर्थ्य हे केवळ लिंबामध्ये आहे. लिंबाचे पुरातन काळापासून असणारे महत्त्व आणि लिंबाचे फायदे लक्षात घेता, आपण आपल्या आहारामध्ये वेगवेगळ्या पध्दतीने लिंबाचा समावेश करतो.

लिंबाच्या नियमित सेवनामुळे कर्करोगाच्या वाढीस प्रतिबंध घालण्यास मदत होते. लिंबामध्ये असलेले घटक कर्करोग वाढण्यापासून बचाव करतात. लिंबात व्हिटमिन सी असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते. तसेच मलेरीया आणि कॉलरा यांसारखे रोग झाल्यास उपचाराच्या वेळी लिंबाचा वापर औषधी म्हणून उपयोग केला जातो.

अपचन या समस्येवर लिंबू अतिशय फायदेशीर ठरते. कधी काही अतिरीक्त खाण्यात आले, की लागलीच अपचनाची समस्या उदभवते. पण रोज कोमट पाण्यामध्ये लिंबाचा रस पिळून पिल्याने हा अपचनााचा त्रास होत नाही.

अंघोळ करताना अंघोळीच्या पाण्यात लिंबाच्या रसाचे काही थेंब मिसळले तर शरीराचा व चेहऱ्याचा रंग उजळतो. शरीरात चैतन्य व स्फूर्ती वाढते. चेहऱ्यावर काळे–पिवळे डाग पडले असतील तर ते घालवण्यासाठी लिंबाच्या रसात नवसागर मिसळून दररोज लावावा.

टक्कल पडण्याच्या प्राथमिक अवस्थेत जर डोक्यात लिंबू चोळले तर फायदा होतो. कोमट पाण्यात लिंबाचा रस मिसळून डोके धुतल्यानंतर केसांना नैसर्गिक चमक येते व केस सुंदर व मुलायम होतात.

रात्री झोपताना चेहऱ्याला लिंबाचा रस लावावा व सकाळी उठल्यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवावा. चेहरा उजळेल व सुरकुत्याही कमी होतील. लिंबाचा रस आणि कच्चे दूध मिसळून लावल्याने चेहरा व शरीराचा रंग उजळतो. ◆

# मी एक कामगार

मी एक सर्वसाधारण कामगार
कुटुंबाच्या चरितार्थाचा कोषागार
मित्र–मंडळीं माझे सह–सल्लागार
देवासमान प्रिय मला रोजगार

भारत भूमी रत्नांची खाण
जगात आहे त्याची शान
मी कामगार हा त्याचा प्राण
१ मे ला मजला भारीच मान

पण...?

विचार करा ना थोडा फार
कामगार म्हणजे, का? म गार?
वाढती महागाई करी बेजार
कारण वाढे ना माझा पगार

१ मे ला सुट्टी देऊन काय होणार!
रोजचा दिवस मात्र तोच असणार
कामाची दखल माझी कोण घेणार
महागाई अन् पैशांचा मेळ कसा घालणार

करा हो माझ्याही मनाचा विचार
करू नका मला वेळोवेळी लाचार
माझ्याशीही ठेवा जरा शिष्ट आचार
माणुसकीचा होऊ द्या अंगी संचार

राब राब राबतो जनावरावानी
पण विचारत जा कुणीतरी पाणी
धीर येई ऐकून तुमची प्रेमाची वाणी
आशा–मनीषा नव्याने गातील गाणी

मनीषा साळुंखे, मीरा रोड.



# सिद्धार्थ गौतम बुद्ध

लुंबिनी नगरीत म्हणजे (सध्याचा दक्षिण नेपाळचा भाग) राजा शुद्धोधन व महाराणी महामाया यांच्या पोटी इ.स.पूर्व ५६३ मध्ये राजपुत्र जन्माला आला. त्याचं नाव ठेवलं सिद्धार्थ. त्याच्या जन्मानंतर अवघ्या सातव्या दिवशी त्यांच्या मातेचं निधन झालं. सिद्धार्थचा सांभाळ त्याची सावत्र आई गौतमीने केला. त्यामुळे त्यांना 'सिद्धार्थ गौतम' असेही म्हणतात.

जन्मत:च वैभवशाली जीवन प्राप्त झालेलं असल्याने दु:ख, दैन्य, वेदना याचा वाराही राजाने त्याला लागू दिला नाही. सोळा वर्षाचा झाल्यानंतर सिद्धार्थचा विवाह यशोधरा नावाच्या सुंदर कन्येशी झाला. तिने एका मुलास जन्म दिला. त्याचे नाव राहुल असे ठेवण्यात आले.

लोककथेनुसार असे सांगितले जाते, की राजपुत्र सिद्धार्थ रथामध्ये बसून नगरातून फेरफटका मारत असताना त्यांना जीर्ण शरीराचा आजारी मनुष्य दिसला. त्यानंतर एक अतिशय वृद्ध व्यक्ती दिसली. पुढे एक प्रेतयात्रा दिसली. मनुष्य जीवनाच्या या अटळ आणि स्वाभाविक अवस्था पाहून त्यांचे मन सुन्न झाले. वर्तमानाचं सुखी आयुष्य शेवटी असं कठीण होत जाणार. यातून मुक्त होण्याचा संन्यास हाच एक मार्ग आहे असं समजून त्यांनी संसाराचा त्याग करायचे ठरवले. वयाच्या २८ व्या वर्षी एका पावसाळी रात्री पत्नी यशोधरा आणि बाळ राहुल यांचे लांबूनच दर्शन घेऊन सिद्धार्थ राजवाड्या बाहेर पडले. आत्मबोधाच्या शोधात ते अनेक गुरुंकडे गेले. शेवटी त्यांनी अन्न पाण्याचा त्याग करुन आत्मक्लेषाचा बिकट मार्ग स्वीकारला; परंतु या मार्गानेही ज्ञानप्राप्ती झाली नाही. म्हणून ध्यानाचा मार्ग निवडला. एके दिवशी अश्वत्थ (पिंपळाच्या) वृक्षाखाली बसून अंतिम सत्याची प्राप्ती होईपर्यंत न उठण्याचा निश्चय केला. ४९ दिवसांच्या अखंड तपस्येनंतर वयाच्या ३५ व्या वर्षी वैशाख शुद्ध पौर्णिमेला त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. इथून पुढे त्यांना 'बुद्ध' म्हटले जाऊ लागले. बुद्ध म्हणजे ज्ञानी.

भगवान बुद्धांनी पाली या लोकभाषेतून साध्या सोप्या पद्धतीने बौद्ध धर्माची शिकवण दिली. ते म्हणतात, मानवी जीवन दु:खमय आहे. कधीही पूर्ण न होणाऱ्या इच्छा हे न संपणाऱ्या दु:खाचं कारण आहे. सर्व प्रकारची आसक्ती सोडणे हाच दु:खावर उपाय आहे. त्यासाठी सदाचाराचा मार्ग अवलंबावा, असे तत्वज्ञान त्यांनी लोकांना शिकवले.

बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी त्यांनी भिख्खूंचा संघ स्थापन केला. त्यांची पत्नी आणि मुलगा राहुल यांनीही बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. ◆

# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालरा




नंतर उजवीकडे पाहावे.


जर लाल दिवा
असेल तर थांबावे.


जेव्हा पिवळा दिवा लागला,
की जाण्यासाठी तयार राहावे.


आणि जेव्हा हिरवा दिवा लागेल तेव्हा रस्ता ओलांडावा.
नेहमी आपल्या एका बाजूने चालावे.
रस्त्यालगत असलेल्या फूटपाथवरुनच चालावे.


विकलांग किंवा म्हाताऱ्या माणसांना रस्ता ओलांडण्यास मदत करावी.
शाब्बास किट्टी! खूप छान सांगितलं.
सर्वांनी किट्टीसाठी टाळ्या वाजवा.

# ज्ञानासंगे मनोरंजनाची सफर

मुबई या देशाच्या आर्थिक राजधानीचा भौगोलिक विस्तार तसा चिंचोळा, तरीही मुंबईत पाहण्यासारखी लहान मुलांसाठी छान–छान ठिकाणं आहेत. मुंबई सतत धावत असली तरी मुलांच्या मनोरंजनाकडेही तिचं लक्ष असतं. मनोरंजनाबरोबरच मुलांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून मुंबईनं आपल्याला आगळीवेगळी पर्यटनस्थळं दिली आहेत. त्याला गेल्या दशकभरात नवीन साजही चढवण्यात आला.

## नेहरु विज्ञान केंद्र

देशातलं सर्वात मोठं विज्ञान केंद्र वरळी येथे आहे. आठ एकर परिसरावर बांधलेलं हे विज्ञान केंद्र १९७७मध्ये सुरु झालं. याला पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांचं नाव देण्यात



आलं. सुरुवातीला हे विज्ञान केंद्र जनतेसाठी खुलं नव्हतं. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या आग्रहामुळे ११ नोव्हेंबर, १९८५ या दिवशी हे विज्ञान केंद्र जनतेसाठी खुलं झालं. इथं देषातील विविध प्रजातींच्या ५००हून अधिक वनस्पतींची लागवड केली आहे. ऊर्जा, ध्वनी, गती, मेकॅनिक्स, मालवाहतूक अशा विविध विषयांवार इथे कायमस्वरुपी प्रदर्शनं मांडली आहेत. होळीचा आणि दिवाळीचा दुसरा दिवस असे दोन दिवस सोडले तर वर्षातले सर्व दिवस सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे विज्ञान केंद्र खुलं असतं. विज्ञान केंद्रात गेल्या दशकभरात काही सुधारणा करुन ते अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला गेला. त्याचाच भाग म्हणून इथल्या प्रत्येक प्रदर्शनात तुम्ही गेलात, की तुम्हाला तिथं ठेवलेल्या यंत्राविषयी किंवा साधनांविषयीची माहिती ऐकता येते आणि त्याचवेळी वाचताही येते. इथे मुलांच्या नवकल्पनांना वाव देण्यासाठी इनोव्हेशन हब तयार करण्यात आलं आहे. यात रोबोची जुळणी, विज्ञान कीटसारख्या सुविधा मुलांना दिल्या जातात.

## तारापोरवाला मत्स्यालय

चर्नीरोडला तारापोरवाला मत्स्यालय हे देशातलं सर्वात जुनं मत्स्यालय. १९५१ मध्ये बांधलेल्या या मत्स्यालयाचं नूतनीकरण २०१५ मध्ये झालं. आता नव्या रुपातल्या या मत्स्यालयात १२ फूट लांब आणि १८० अंश किंवा अर्धवर्तुळकारा ॲक्रेलिक बोगदा आहे. ४०० हून अधिक प्रजातींचे दोन हजार मासे इथे पाहायला मिळतात. याशिवाय प्रवाळ, खेकडे, पाणकासवं, पाणवनस्पतीही आहेत. निळ्याशार एलईडी प्रकाशात हे जलचर फारच विलोभनीय दिसतात. हे मत्स्यालय फक्त सोमवारी सुट्टी घेतं. अन्य



दिवशी ते सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सशुल्क खुलं असतं. नव्या सुविधा देताना एक छोटं थिएटर बांधण्यात आलं आहे, जिथं जलचरांच्या ध्वनिचित्रफिती पाहता येतात. याशिवाय फिश स्पादेखील सुरु करण्यात आला आहे. मुलांना स्टार फिश, सागरी कासवे यांना हात लावता यावा, यासाठी टच पूलही तयार करण्यात आला आहे.

## नेहरु तारांगण

वरळीतच नेहरु तारांगणाची वास्तू आपलं लक्ष सहज वेधून घेते. आबालवृद्धांमध्ये खगोलशास्त्राविषयी गोडी निर्माण व्हावी. या मुख्य हेतूने ३ मार्च, १९७७ या दिवशी तारांगणची सुरुवात झाली. ज्ञान आणि मनोरंजन



या दोन्हींसाठी तारांगणला भेट द्यायलाच हवी. मुख्य म्हणजे इथे मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांमध्ये अवकाश दर्शनाचे कार्यक्रम होतात. अवकाशातले तारे, तारका, नक्षत्रं, ग्रहगोल हे आपल्याला रिलॅक्सिंग चेअरमध्ये आरामात बसून पाहता येतात. सारं आकाश अक्षरशः कवेत घेता येतं आपल्याला! तारांगण मुलांसाठी खगोलकाव्य, खगोल–प्रश्नमंजुषा असे कार्यक्रमही आयोजित करतं. सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहणाचा अभ्यासही इथं करता येतो. तारांगण दर्शनाच्या कार्यक्रमांसाठी ऑनलाइन बुकिंगची सुविधा आहे. यामध्ये कथक कार्यशाळा, नाट्य शिबिर यासह सांस्कृतिक कार्यक्रमही आता आयोजित केले जातात.

## कमला नेहरु उद्यान

वाळकेश्वरला राजभवन ओलांडून पुढे गेलात, की येतं कमला नेहरु उद्यान आणि फिरोजशहा मेहता गार्डन. याचं जुनं नाव हँगिग गार्डन्स. उल्हास घापोकर या मराठी माणसाने १८८१ मध्ये मुंबईचा मुख्य पाणीसाठा सुरक्षित राहावा, यासाठी एक भन्नाट कल्पना होती, मुंबईच्या या पाणीसाठ्यावरच एक विस्तीर्ण बगिचा फुलवण्याची. यानुसार हँगिंग गार्डन्सच्या फिरोजशहा मेहता उद्यानची उभारणी झाली. समोरच्या बाजूला हँगिंग गार्डन्सचा दुसरा भाग आहे, कमला नेहरु उद्यान. चार एकरात असलेल्या या उद्यानात ‘देअर वॉज अॅन ओल्ड वूमन हू लिव्हड इन अ शू’ या इंग्रजी कवितेतून प्रेरणा घेऊन एक भव्य बूट बांधण्यात आला. हा बूट म्हातारीचा बूट म्हणून प्रसिद्ध झाला. याचं डिझाइन मुंबई महापालिकेचे माजी पर्यावरण अधिकारी सोली आर्सेवाला यांनी केलं. आता या बागेत ‘जंगल बुक’ या प्रसिद्ध अॅनिमेशन फिल्मधील पात्र साकारली आहेत. म्हातारीच्या बुटाला नवा रंग देण्यात आला आहे. या बुटात वरपर्यंत मुलांना घेऊन जाण्यासाठी एक सुरक्षा रक्षकही तैनात करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मुलांना फोटो काढता यावेत यासाठी सेल्फी पॉइंटची निर्मिती करण्यात आली आहे. ◆




# शिल्पकलेची बोलकी रूपं



जगभरात शिल्पकलेचे सुंदर नमुने आपल्याला पाहायला मिळतात. अशा अप्रतिम नमुन्यांमधून दिसणारं त्या कलेचं सौंदर्य अतिशय बोलकं असतं. या मूर्त रूपातून साकारलेलं त्या शिल्पाचं बोलकं रूप त्या संकल्पनेला सर्वार्थाने साध्य करतं. म्हणूनच ही शिल्प लोकप्रिय ठरतात.

ही शिल्प साकारताना त्या कलाकाराच्या कल्पकतेला दाद द्यावीशी वाटतेच. प्रथमतः ही शिल्पं वा म्युरल पाहताना आपल्याला त्याचा अर्थबोध होत नाही. कदाचित, शिल्पकाराकडून एखादी चूक झाली असावी अथवा म्युरलचं नुकसान झालं असावं, असंच सर्वसामान्य लोकांना वाटू शकतं. मात्र, ही शिल्पं म्हणजे त्या कलाकाराच्या कलेचा अस्सल नमुना आहे, हे कळायलाही फार उशीर लागत नाही आणि ही शिल्पं वा म्युरल लोकप्रिय होतात.



अमेरिकेच्या पोर्टलँड येथील इमारतीत आत घुसलेलं माशाचं शिल्पही असंच अल्पावधीत लोकप्रिय ठरलं आहे. हे शिल्प पाहण्यासाठी पर्यटक तेथे आवर्जून भेट देतात व त्याचं छायाचित्र काढतात. याबरोबरच दुसरं शिल्प आहे, ते फ्रान्समधील मार्सिलेसच्या समुद्रकिनाऱ्यावर असलेलं दृश्य–अदृश्यतेचा भास निर्माण करणारं मानवी आकृती असलेलं शिल्प. हे शिल्प प्रथम अर्धवट असल्याप्रमाणे भासतंय परंतु नीट पाहिल्यावर त्यातली कल्पकता लक्षात येते. निळ्या समुद्राच्या पार्श्वभूमीवर असलेलं हे मानवी आकृतीचं शिल्प खरोखरच सुंदर आहे.

या यादीत अनेक वेगवेगळ्या कलाकृती आहेत. यात लंडनमधील महाकाय स्पायडर अर्थात, कोळी भाव खाऊन जातो. लंडनमधील एका पार्कमध्ये उभारण्यात आलेलं हे शिल्प म्हणजे आधुनिक शिल्पकलेचा उत्तम नमुना आहे. ऑस्ट्रेलियाच्या मेलबर्न शहरातील बुडणारी इमारत, तैवानमधील रस्त्याच्या मधोमध असणारे गेंडे, रोमानियामधील मिहाई एमिनेस्कू ही मानवी चेहऱ्यावरील भावनांच्या छटा दर्शवणारी कलाकृती ही याची काही उत्तम उदाहरणं आहेत. या भन्नाट कलाकृती जगभरातील पर्यटकांना त्या ठिकाणास भेट देण्यास भाग पाडतात. ◆

# दिवसातून फक्त दोनदाच दिसणारा रस्ता

एखादा प्राणी, पक्षी आपल्याला क्वचितच दिसतो. सकाळी वा संध्याकाळी अशा नियमित वेळेलाही नित्यनेमाने काही पक्षी आपलं दर्शन देतात. काही पक्षी वा प्राणी एखाद्या विशिष्ट वेळेलाच आपल्याला दर्शन देतात, तसं एखाद्या रस्त्याबाबत घडू शकतं का,असा प्रश्न तुम्हाला कोणी विचारला तर? तुम्ही अशा व्यक्तीची गणना नक्कीच मूर्ख लोकांमध्ये कराल; पण, असा रस्ता खरोखर आहे, जो दिवसातून काही विशिष्ट वेळेतच दिसतो. हा रस्ता दिवसातून दोनदा केवळ दोन तासापुरताच दिसतो.

फ्रान्सच्या अटलांटिक महासागरात असणाऱ्या मॅनलँड को नॉरमॉटियर या बेटाला जोडणारा हा रस्ता आहे. या रस्त्याची लांबी ४.५ किलोमीटर आहे. हा रस्ता फ्रान्समध्ये 'पॅसेज डू गोइस' या नावाने ओळखला जातो, ज्याचा अर्थ, चप्पल ओली करत रस्ता पार करणे असा होतो.

महासागरातील बेटाला किनाऱ्यापासून जोडणारा हा रस्ता आहे. बेटाला जोडणाऱ्या रस्त्यावर पाणी असले, तरी ते साधारणतः एक ते दोन फूट इतकेच असू शकते. काही रस्त्यांवर यापेक्षा जास्त पाणी असले, तरी पूर्ण रस्ता यात बुडून जात नाही; परंतु हा रस्ता केवळ काही वेळच दिसतो. त्या दोन तासांनंतर या रस्त्यावर १३ ते १४ फुटाइतके पाणी येते. दिवसातून दोनदा दोन तासांसाठी मोकळा होणारा हा रस्ता कधी पाण्याखाली जाईल, याची शाश्वती नसते. यामुळेच येथे अपघात होण्याचं प्रमाण जास्त आहे.. समुद्राला येणाऱ्या भरती व ओहोटीच्या वेळेनुसार हा रस्ता मोकळा होत असला, तरी याबाबत इतरही भौगोलिक कारणं आहेत, असं संशोधक सांगतात. ◆





कविता

# शीश गुरुचरणी वाहिले

अवतरला जनसागर
सद्‌गुरुची काय लीला !
अनेकतेतून एकतेचा
साक्षात्कार मज झाला

गुरूमाऊलीच्या दर्शना
घाई अंतर्मनात झाली
आत्मसुखाची मजला
अहो, खरी प्रचिती आली

गुण सगुण साकाराचे
काव्य भजनातून गाईले
अनुशासन अन् शिस्तीचे
अनोखे रुप पाहिले

सद्‌गुरु विराट रुपाने
येथे साक्षात भेटला
प्रेमाभक्तीचा बोध
गोड वाणीने वाटला

याची देही याची डोळा
रुप सद्‌गुरुचे पाहिले
भावभक्तीच्या सोहळ्यात
शीश गुरुचरणी वाहिले

गणेश सदाशिव साळवी
इंदापूर – रायगड



# महाराष्ट्र राज्याची माहिती

योग्य पर्याय निवडा

१. महाराष्ट्र राज्याची स्थापना : १ मे १९६०/१ जून १९६०

२. महाराष्ट्राची राजधानी : दिल्ली/मुंबई

३. महाराष्ट्राची उपराजधानी : पुणे/नागपूर

४. महाराष्ट्रातील एकूण जिल्हे : २६/३६

५. महाराष्ट्राची पर्यटन राजधानी : संभाजीनगर/मुंबई

६. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री : शंकराव चव्हाण/यशवंतराव चव्हाण

७. महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना : प्रवरानगर/संभाजीनगर

८. महाराष्ट्राला लाभलेल्या अरबी समुद्र किनाऱ्याची लांबी : ७२० किमी/८२० किमी

९. महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर : कळसूबाई / मांगीतुंगी

१०. महाराष्ट्रातील सर्वात मोठे धरण : जायकवाडी / कोयना

११. महाराष्ट्रातील सर्वात लांब नदी : गोदावरी / वैनगंगा

१२. महाराष्ट्रातील सर्वात मोठी सहकारी सूतगिरणी : इचलकरंजी / मुंबई

१३. महाराष्ट्रातील सर्वात जास्त साखर कारखाने असलेला जिल्हा : कोल्हापूर/सोलापूर

१४. महाराष्ट्रातील सर्वात जास्त तापमान आढळून येणारा जिल्हा : चंद्रपूर/भंडारा

१५. मराठीतील पहिले वृत्तपत्र : दर्पण/मराठा

१६. महाराष्ट्रात सर्वात जास्त खेडी असणारा जिल्हा : रत्नागिरी/अहमदनगर

१७. क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा असलेला जिल्हा : सोलापूर/अहमदनगर

१८. क्षेत्रफळाच्या दृष्टीने लहान असलेला जिल्हा : मुंबई/ ठाणे

१९. जास्त विहिरी असलेला जिल्हा : भंडारा/अहमदनगर

उत्तरे इतरत्र

# १० वी नंतरच्या

## १०वी नंतर शास्त्र, वाणिज्य आणि कला या शाखांच्या व्यतिरिक्त

| कोर्स / टप्पे | डिप्लोमा इंजिनिअरिंग | आय टी आय |
|---|---|---|
| अर्ज करण्याचा कालावधी | १०वी निकालानंतर जुलै | १०वी निकालानंतर जुलै |
| कोर्स कालावधी | ३ वर्षे | १/२/३ वर्षे |
| उपलब्ध आस्थापना | ४०० पेक्षा जास्त | ४१७ शासकीय/खासगी ४००+ |
| उपलब्ध जागा | १ लाखापेक्षा जास्त | १.२५ लाखापेक्षा जास्त |
| उपलब्ध शाखा | सिविल, मेकेनिकल इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, लेदर/ प्लास्टिक/ रबर/ टेक्सटाईल/ फॅशन टेक्नोलॉजी, बायोटेक, मायिनंग मेटलर्जी इ. | गवंडी, प्लंबर, सुतारकाम, फाउंड्रीमन, पेंटर, फिटर, इलेक्ट्रिशियन, टर्नर, मशिनिस्ट, सर्व्हेअर टूल अँड डायमेकर, मेकेनिक मशीन टूल इ. ७९ ट्रेड |
| प्रवेश प्रक्रिया | राज्यस्तरीय सामायिक प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून अर्ज केल्यावर जिल्हानिहाय विद्यार्थ्यांच्या पसंतीक्रम आणि गुणवत्तेनुसार प्रवेश | दहावीच्या निकालानंतर admission.dvet.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून जिल्हानिहाय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया. |
| रोजगार/व्यवसाय संधी | राज्य/केंद्र सरकारच्या बऱ्याच आस्थापनांमध्ये आणि खाजगी उद्योगांमध्येही नोकरीच्या संधी. त्यात प्रामुख्याने भाभा संशोधन केंद्र, भेल (BHEL), रेल्वे, संरक्षण दले, आरटीओ, बीएसएनएल हे प्रामुख्याने होय. | राज्य / केंद्र सरकारच्या बऱ्याच आस्थापनांमध्ये आणि खाजगी उद्योगांमध्येही नोकरीच्या संधी |
| पुढील शैक्षणिक संधी | डिप्लोमा ५०% किंवा त्यापेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्याच शाखेच्या पदवी शाखेत २ऱ्या वर्षाला प्रवेश मिळतो. | इंजिनियरिंग डिप्लोमाला प्रवेश मिळतो, प्रत्येक तंत्रनिकेतन मधील प्रत्येक शाखेत १ जागा ITI उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता राखीव. |
| संबंधित संकेतस्थळ | www.dtemaharashtra.gov.in | www.dvet.gov.in |

# करिअरच्या वाटा

## उपलब्ध असलेल्या शाखांची माहिती या ठिकाणी देत आहोत.

| | | |
|---|---|---|
| किमान कौशल्य अभ्यासक्रम | कृषी तंत्र पदविका | फाईन आट्‌र्स पदविका |
| १०वी निकालानंतर जुलै | १०वी निकालानंतर जुलै | १०वी निकालानंतर जुलै |
| २ वर्षे | २/३ वर्षे | ४ वर्षे |
| प्रत्येक जिल्ह्यात | ९ शासकीय कृषीतंत्र शाळा / २२७ कायमस्वरुपी विना अनुदानित कृषी तंत्र विद्यालय | ४० ते ४५ |
| २० ते ३० हजार | कृषीतंत्र शाळा-५४० जागा<br>कृषीतंत्र विद्यालय-५०००+जागा | २००० ते ३००० |
| इंजिनिअरिंग टेक्नोलॉजी,बिजनेस अँड कॉमर्स,एग्रीकल्चर, फिशरी, अर्धवैद्यकीय गट आणि होम सायन्स या सहा गटांच्या माध्यमातून वीस कोर्सेस उपलब्ध | कृषीतंत्र पदविका (२ वर्षे)<br>कृषी तंत्रनिकेतन पदविका (३ वर्षे) | यात ड्रॉइंग अँड पेटिंग (४ वर्षे), स्कल्पचर (४ वर्षे), अप्लाइड आर्ट (४ वर्षे), टेक्सटाईल डिझाईन (२ वर्षे), मेटल क्राफ्ट (२ वर्षे) असे विविध पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. |
| दहावीच्या निकालानंतर संबंधित कॉलेजमध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश | कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून | १०वी नंतर एक वर्षाचा फाउंडेशन कोर्स उत्तीर्ण होणे आवश्यक असते. तद्‌नंतर महाविद्यालय निहाय |
| स्वयंरोजगारावर भर | स्वयंरोजगार/ग्रामसेवक, कृषी सेवक, तलाठी तसेच वन विभागातील काही पदांसाठी करिअर संधी उपलब्ध असते. | फोटोग्राफी, सेट डिझाईनिंग, कमर्शियल आर्टिस्ट म्हणून जाहिरात संस्थेत काम करु शकतात तथा स्वतंत्र व्यवसाय. |
| कॉमर्स, आट्‌र्स, लॉ, हॉटेल मॅनेजमेंट यासारख्या विषयात पदवीपर्यंत शिक्षण घेता येते. | बीएससी एग्रीकल्चर, फॉरेस्ट, होम सायन्स, बायोटेक्नोलॉजी, फूड सायन्स या शाखांसाठी कृषी पदविकाधारक (३ वर्षे) विद्यार्थ्यांना थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळत असतो. | कलाशाखेतील पुढील शिक्षण |
| -- | https://mpkv.ac.in/ &<br>http://www.mcaer.org | -- |

# रंग भरा






## शब्दकोडे

## २१८चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ■ | १ म्हा | ■ | २ अ | ■ | ३ का | की |
| ४ सी | ता | ■ | ५ ह | रा | म | ■ |
| ■ | ६ र | क्क | म | ■ | ७ गा | रा |
| ■ | प | ■ | ८ दा | द | र | ■ |
| ९ प | ण | जो | बा | ■ | ■ | १० पा |
| श्चि | ■ | ■ | ११ द | १२ श | को | न |
| १३ म | १४ रा | ठी | ■ | ब | ■ | शे |
| ■ | जा | ■ | १५ प | री | क्षि | त |

### सामान्यज्ञान उत्तरे

१) १ मे १९६०
२) मुंबई
३) नागपूर
४) ३६
५) संभाजीनगर
६) यशवंतराव चव्हाण
७) प्रवरानगर
८) ७२०
९) कळसूबाई
१०) जायकवाडी
११) गोदावरी
१२) इचलकरंजी
१३) सोलापूर
१४) चंद्रपूर
१५) दर्पण
१६) रत्नागिरी
१७) अहमदनगर
१८) मुंबई
१९) अहमदनगर

॥ तू ही निरंकार ॥

पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी । पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी ।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी । पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी ।
पूर्ण सद्गुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी । पूर्ण सद्गुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी ।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा । घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा ।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है । ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है ।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। गुरू की जैं जैं जो करता हैं उसकी होती जैं जैं कार।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा। गुरू की पूजा जो करता हैं उसको पूजे कुल संसार।

१९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

॥ तुही निरंकार ॥



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील
अंचित रा. पाटील
राकेश ज. पाटील
कुशल रा. पाटील